# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

जा.क्र.मका/कार्यक्रम/२०१९-२०/ 92
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार
क्रीडा भवन,सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी
रेल्वे स्टेशन जवळ,मुंबई ४०००१३.
दिनांक:03/01/2020

परिपत्रक :

विषय :-**राज्यस्तरीय "कामगार केसरी " व " कुमार केसरी " कुस्ती स्पर्धा -२०१९-२०**
**कोल्हापूर**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगारासाठी **"कामगार केसरी"** व कामगार कुटुंबीयासाठी **"कुमार केसरी "** कुस्ती स्पर्धा **दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० ते २६ फेब्रुवारी, २०२० या कालावधीत छत्रपती शाहू कुस्ती मैदान,खासबाग,मंगळवारपेठ,कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेचे नियम व अटी पुढिलप्रमाणे-

१) मंडळाची कुस्ती स्पर्धा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या नियमाप्रमाणे व कोल्हापूर शहर तालीम संघाच्या सहकार्याने होतील.
२) सदर स्पर्धा मॅटवर घेण्यात येईल.
३) स्पर्धा बाद पद्धतीने घेण्यात येतील.
४) पंचाचा निर्णय अंतीम राहील.
५) कामगार केसरी स्पर्धेतील स्पर्धक हा स्वतः कामगार असावा आणि तो ज्या आस्थापना / व्यवस्थापनेत काम करत असेल त्या आस्थापना / व्यवस्थापनेकडुन तो स्वतः कामगार असल्याचे प्रमाणपत्र (सर्टिफीकेट) त्याला सादर करावे लागेल. तसेच त्यांनी स्पर्धे करीता येतांना आस्थापनेने दिलेले स्वतःचे ओळखपत्र आणावे त्या शिवाय त्यांना प्रवास खर्च व दैनिक भत्ता दिला जाणार नाही.
६) कुमार केसरी स्पर्धेतील स्पर्धक कामगारांवर अवलंबुन असेल तर त्याला पालकांची माहे जून/डिसेंबर २०१९ ची वेतन पावती/व्यवस्थापनेचा दाखला (**कामगार कल्याण निधी कपात उल्लेख असलेला)** तसेच रेशन कार्डची सांक्षाकीत प्रत सोबत जोडावी.
७) स्पर्धेमधील कुस्त्या मॅटवर होणार असल्याने स्पर्धकांनी नियमाप्रमाणे पायामध्ये रेसलिंग शुज / कॉफी शुज घातले पाहिजेत. तसेच स्पर्धकास कॉसच्युम वापरणे बंधनकारक राहील. अन्यथा स्पर्धकाला स्पर्धेत सहभाग दिला जाणार नाही.
८) स्पर्धेत भाग घेणाऱ्या पहिलवानाने स्वेच्छेने आणि स्वतःच्या जबाबदारीवर भाग घ्यावा.
९) कामगार केसरी व कुमार केसरी गटात खेळणारा स्पर्धक वजनी गटात खेळु शकणार नाही.
१०) कामगार केसरी/कुमार केसरी आणि वजनी गटातील कुस्तीसाठी आपले निवडक खेळाडूंचे प्रवेश अर्ज पाठविताना संबंधित आस्थापनेने त्यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सही व शिक्क्यासह आस्थापनेच्या लेटर पॅडवर खेळाडुंच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. अथवा प्रवेशिका स्विकारली जाणार नाही. प्रवेशिका दिलेल्या मुदतीत सादर करावी.
११) कोल्हापूर वगळता बाहेरील कामगार स्पर्धक व कामगार कुटुंबीय स्पर्धक पहिलवानांना नियमाप्रमाणे प्रतिदिनी रु.१००/- प्रमाणे दैनिक भत्ता (भोजन भत्ता) दिला जाईल. तसेच स्पर्धकास कमीत कमी दराचा रेल्वे / एस.टी.चा परतीसह प्रवासखर्च स्पर्धेच्या ठिकाणी दिला जाईल. त्याकरीता त्यांनी तिकिटे दिली पाहिजे. तिकिट असणे बंधनकारक राहिल. त्याशिवाय प्रवास खर्च दिला जाणार नाही.
१२) कुमार केसरी गटात भाग घेणाऱ्या पहिलवानांचे वय १८ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी आणि वजन ५५ किलो पर्यंत असावे.
१३) कामगार केसरी गटात भाग घेणाऱ्या पहिलवानाचे वजन कमीत कमी ७५ किलो पेक्षा कमी आणि ८५ किलो पेक्षा जास्त असू नये. त्यापेक्षा जास्त वजन असलेल्या पहिलवानास स्पर्धेत प्रवेश दिला जाणार नाही. तसेच त्याला प्रवासखर्च व दैनिक भत्ता दिला जाणार नाही.
१४) खुल्या गटाची स्पर्धा ही पाच वजनी गटात घेण्यात येईल.

..२.

१५) या स्पर्धेसाठी जे स्पर्धक सहभागी होतील त्यांच्याकडुन प्रवेश अर्ज भरुन घ्यावेत. प्रवेश अर्जाचा नमुना सोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या स्तरावर प्रवेश अर्ज स्पर्धकांना उपलब्ध करुन द्यावेत.

१६) स्पर्धेत भाग घेणाऱ्या विजेत्या पैलवानांना पुढिलप्रमाणे रक्कमेची बक्षीसे आणि प्रशस्तीपत्र देण्यात येतील.

| बक्षिस | कुमार केसरी (५५ किलो पर्यंत) | कामगार केसरी (७५ते८५किलो पर्यंत) |
|---|---|---|
| प्रथम | रु.१५,०००/- | रु.२१,०००/- |
| द्वितीय | रु.७,५००/- | रु.१५,०००/- |
| तृतीय | रु.५,०००/- | रु.१०,०००/- |
| उत्तेजनार्थ | रु.२,५००/- | रु.५,०००/- |
| एकुण रक्कम | रु.३०,०००/- | रु.५१,०००/- |

**खुला गट**

| गट क्रमांक | प्रथम | द्वितीय | तृतीय | चतुर्थ | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| गट १ ला ५७ किलो पर्यंत | १,०००/- | ७,५०/- | ५००/- | ३००/- | २,५५०/- |
| गट २ रा ६१ कि. पर्यंत | १,२००/- | १,०००/- | ७५०/- | ५००/- | ३,४५०/- |
| गट ३ रा ६५ कि. पर्यंत | १,५००/- | १,२००/- | १,०००/- | ७५०/- | ४,४५०/- |
| गट ४ था ७० कि. पर्यंत | १,७००/- | १,५००/- | १,२००/- | १,०००/- | ५,४००/- |
| गट ५ वा ७४ कि. पर्यंत | २,०००/- | १,७००/- | १,५००/- | १,२००/- | ६,४००/- |

१७) या स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या पहिलवानांची वजने **रविवार दि २३ फेब्रुवारी , २०२०** रोजी सकाळी १०.०० ते सांय ६.०० वाजे पर्यंत आणि **सोमवार दि.२४ फेब्रुवारी, २०२०** रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत घेण्यात येतील.

स्पर्धेच्या सर्व प्रवेशिका ह्या **दि.१८ फेब्रुवारी, २०२०** पर्यंत **प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय, कामगार कल्याण भवन,सहकारनगर, पुणे येथील** कार्यालयात पोस्टाद्वारे अथवा ई-मेल द्वारे पाठवावेत. अधिक माहितीसाठी **०२०-२४२२३७३९** या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच मध्यवर्ती कार्यालयातील कार्यक्रम शाखेचा दुरध्वनी क्रमांक **०२२-४३२२६८१७** वर संपर्क साधावा. बाहेरगावच्या पहिलवानांची निवास व्यवस्थे ठिकाण स्वंतत्र पत्राने कळविण्यात येईल.

उपरोक्त तपशिलाप्रमाणे मंडळाच्या राज्यस्तरीय कामगार केसरी / कुमार केसरी व खुल्या गटातील कुस्ती स्पर्धेत जास्तीत जास्त पहिलवानांनी भाग घ्यावा यासाठी मंडळाच्या सर्व विभाग व गट तसेच केंद्र प्रमुखांनी प्रयत्न करावेत. यासाठी सर्व विभाग / गट अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यकक्षेत येणाऱ्या सर्व औद्योगिक व व्यावसायिक कारखान्यांना तसेच साखर कारखान्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन जास्तीत जास्त स्पर्धक पहिलवान स्पर्धेकरीता पाठवीणे आवश्यक आहे.

स्पर्धक मिळविण्याकरीता केलेल्या भेटीची माहिती या कार्यालयास सादर करावी. जे अधिकारी/कर्मचारी स्पर्धेकरीता स्पर्धक पाठविणार नाहीत त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सोबत :- प्रवेश अर्ज

प्र. कल्याण आयुक्त

प्रत :-

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई-१३

२) लेखा अधिकारी /लेखा परिक्षा अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई-१३

३) प्रसिध्दि व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई-१३
४) सर्व सहाय्यक कल्याण आयुक्त/प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
५) सर्व सहाय्यक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
६) कामगार विकास अधिकारी, कामगार कल्याण भवन,नागपूर/पूणे,कामगार क्रीडा भवन,मुंबई.
७) सर्व कामगार कल्याण अधिकारी,सर्व गट कार्यालये.
८) सर्व केंद्र प्रमुख,सर्व कामगार कल्याण केंद्र
९) सर्व समिती पध्दतीवरील साखर कारखाने

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय,हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग,प्रमादेवी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक: ४३२२६८००/२४३०६७१७ ई-मेल - prog.mlwb-mh@gov.in


जा.क्र.: मका/कार्यक्रम/२०१९-२०/१५८ दिनांक:-१३/०२/२०२०

परिपत्रक :

विषय :-राज्यस्तरीय"कामगार केसरी" व "कुमार केसरी "कुस्ती स्पर्धा -२०१९-२०
कोल्हापूर

संदर्भ :-१)मका/कार्यक्रम/२०१९-२०/१२ दिनांक ३.०१.२०२०
२)विकापुणे/कार्यक्रम/२०१९-२०/४०४ दिनांक६.०२.२०२०

उपरोक्त संदर्भीय परिपत्रक क्र.१अन्वये कामगारांसाठी **"कामगार केसरी"** व कामगार कुटुंबीयासाठी **"कुमार केसरी "** कुस्ती स्पर्धा **दिनांक २४ फेब्रुवारी २०२० ते २६ फेब्रुवारी २०२० या कालावधीत छत्रपती शाहू कुस्ती मैदान, खासबाग,मंगळवार पेठ,कोल्हापूर येथे** आयोजित करण्यात आल्याचे तसेच या स्पर्धेत प्रवेश घेणाऱ्या पहिलवानांची वजने रविवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२० रोजी घेण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

या पत्रान्वये उपरोक्त स्पर्धेच्या तारखामध्ये बदल करण्यात येत असून कुस्ती स्पर्धा दिनांक २५ व २६ फेब्रुवारी,२०२० रोजी आयोजित करण्यात येईल व या स्पर्धेत भाग घेणाऱ्या पहिलवानांची वजने सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वा.पर्यत घेण्यात येतील.

तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

Mayade
प्र.कल्याण आयुक्त

प्रत :-

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई
२) लेखा अधिकारी /लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई
३) प्रसिध्दी व जनसंपर्क विभाग,म.का.मुंबई
४) सर्व सहायक कल्याण आयुक्त/प्र.सहायक कल्याण आयुक्त,सर्व विभागीय कार्यालये
५) सर्व सहाय्यक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
६) कामगार विकास अधिकारी,कामगार कल्याण भवन,नागपूर/पूणे
७) सर्व कामगार कल्याण अधिकारी,सर्व गट कार्यालये.
८) सर्व केंद्र प्रमुख,सर्व कामगार कल्याण केंद्र.
९) सर्व समिती पध्दतीवरील साखर कारखाने

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## राज्यस्तरीय "कामगार केसरी" व"कुमार केसरी " कुस्ती स्पर्धा-२०१९-२०

## प्रवेश अर्ज

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | पहिलवानाचे संपूर्ण नाव<br>( आडनाव प्रथम असावे) | | | |
| २. | पहिलवानाचा घरचा पत्ता | | | |
| ३. | दूरध्वनी क्र./भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| ४. | पहिलवानाचा जन्मतारीख / वय (कुमार केसरीकरीता जन्म दाखला सोबत जोडावा.) | तारीखः | वयः | |
| ५. | पहिलवानाचा वजन/गट<br>(प्रवेशिका भरताना अचूक असल्याची खात्री करणे) | | वजन | गट |
| | | कामगार केसरी | | |
| | | कुमार केसरी | | |
| ६. | कामगार कल्याण केंद्राचा किंवा तालीम संघाचा संपूर्ण पत्ता | | | |
| ७. | पहिलवानाची वर्गवारी | कामगार | कामगार कुटुंबिय | |
| ८. | पहिलवान कामगार / कामगार कुटुंबीय असल्यास व्यवस्थापनाचे नाव व पत्ता ,आस्थापना कोड नं. दूरध्वनी क्र. /भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| ९. | प्रवेश अर्जासोबत कामगार पहिलवानांच्या जून / डिसेंबर २०१९ ची कामगार कल्याण निधी दर्शवणाऱ्या वेतनाची स्लिप साक्षंकीत झेरॉक्स/आस्थापनाच दाखला | | | |

### प्रतिज्ञापत्र

मी श्री.-------------------------- असे प्रतिज्ञापत्र लिहून देतो कि, वर दिलेली माहिती खरी व बरोबर आहे.मला या स्पर्धेचे सर्व नियम व अटी माहित आहेत व मान्य आहेत.सदर स्पर्धेत मी स्वच्छेने आणि स्वतःच्या जबाबदारीवर भाग घेत आहे.पंचांनी दिलेला निर्णय मी खिलाडू वृत्तीने स्विकारीन.माझ्याकडून स्पर्धेत कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची मी काळजी घेईन.सदर अर्ज मंडळाच्या नियम व अटीत न बसल्यास किंवा उपरोक्त माहिती सदोष असल्यास अर्ज नाकारण्याचा अधिकार मंडळाला असेल.

व्यवस्थापक / केंद्र प्रमुखाची सही : स्पर्धक पहिलवानाची सही:

तालीम संघ प्रमुखाचे नाव : स्पर्धक पहिलवानाची नाव :

तालीम संघाचे नाव व पत्ता : दिनांक: